
शिल्पकार विकासाचा...

# देशदूत



# या नभाने या भुईला दान द्यावे!

या नभाने या भुईला दान द्यावे आणि या मातीतून चैतन्य गावे. कोणती पुण्ये अशी येती फळाला, जोंधळ्याला चांदणे लगडून जावे. या नभाने या भुईला दान द्यावे आणि माझ्या पापणीला पूर यावे. पाहता सुगंध कांती सांडलेली, पाखरांशी खेळ मी मांडून गावे. गुंतलेले प्राण या रानात माझे, फाटकी ही झोपडी काळीज माझे, मी असा आनंदून बेहोष होता, शब्दगंधे तू मला वाहून घ्यावे या ना.धो.महानोरांच्या कवितेतील पंक्ती आठवतात त्या निसर्गरम्य परिसरात असलेल्या वाघूर धरणातून सोडलेल्या व त्यांनतर पात्रात ओसंडून वाहणाऱ्या जलधारांमुळे. विशेष म्हणजे हे नयनरम्य ड्रोन छायाचित्र आपल्या सोशल मीडियावर प्रकाशित केले ते जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी.



## नवरात्रीच्या दांडियात राहणार पावसाचा गरबा

**पुणे ।** सध्या पितृपक्ष सुरु असून सोमवारपासून नवरात्रीला प्रारंभ होणार आहे. या काळात ठिकठिकाणी उत्साहात साजरा होणाऱ्या दांडिया उत्सवाला पावसाची हजेरी राहणार असून आगामी दोन आठवडे राज्यभरात दमदार पाऊस होणार असल्याने नवरात्रीच्या दांडियात पावसाचा गरबा अनुभवयाला मिळणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून स्पष्ट होत आहे.

राज्यात पुढील दोन आठवडे पाऊस राहणार आहे.यामुळे परतीचा मान्सून देखील राज्यात जोरदार बरसणार असल्याचे संकेत मिळत आहेत.राज्याच्या अनेक भागात सध्या पाऊस बरसत आहे. अनेक भागात जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. साधारणपणे २१ सप्टेंबर पर्यंत राज्यात कमी अधिक प्रमाणात पाऊस राहणार आहे.हवामान विभागाच्या १८ ते २५ सप्टेंबरच्या आठवड्यातील अंदाजानुसार,तळकोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात थोडा अधिकचा पाऊस राहणार आहे.तर २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरच्या कालावधीत दक्षिण मध्य महाराष्ट्राचा काही भाग वगळता जोमदार पाऊस आहे.विशेष म्हणजे कोकण किनारपट्टीवर सरासरीच्या अधिकच्या पावसाचा इशारा या



कालावधीत देण्यात आला आहे. शुक्रवारी उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्राचा आणि मराठवाड्याचा काही भाग,उत्तर विदर्भाचा काही भाग, शनिवारी, रविवारी सोलापूर, दक्षिण मराठवाडा मध्ये येलो अलर्ट देण्यात आला आहे. गुरुवारी दुपारनंत पुण्याला पावसाने पुन्हा झोडपले.दिवस ढगाळ वातावरण आणि दुपारनंतर पावसाची तीव्रता वाढल्याने पुणेकरांची दैना उडाली. सखल भागात पाणी साठले.



# पाच जणांवर काळाचा घाला

## भानगुऱ्यानजीक मध्यरात्री कारची कंटेनरला धडक

**मलकापूर ।** मुक्ताई नगरकडून मलकापूरकडे जाणाऱ्या कारने भानगुरा फाट्याजवळ १७ सप्टेंबरला रात्री ११.१५ वाजेच्या सुमारास कंटेनरला दिलेल्या धडकेत झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू, तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे, तर चार जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये भुसावळ नागरिकांचा समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मारुती ईको कार मुक्ताईनगरकडून मलकापूरकडे येत असताना भानगुरा फाट्याजवळ अज्ञात मोठ्या ट्रेलरला पाठीमागून जोरदार धडकली. धडक एवढी भीषण होती की कारचे पूर्ण चक्काचूर झाली आहे. या धडकेत चालक साजिद बागवान जागीच ठार तर संतोष तेजराव महाले वय ४५ रा याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे तर कारमधील चार




महिलांचा जागीच मृत्यू झाला. मृत महिलापैकी एकीची ओळख अद्याप पटलेली नाही. या अपघातात चार प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांना तत्काळ उपचारासाठी मलकापुर उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले होते. या अपघातात मृतक तानिया साजिद बागवान वय २८ वर्ष रा. भुसावळ, झुमा सिकंदर वय ४८ वर्ष रा. भुसावळ मुळगाव नादिया,पश्चिम बंगाल तर एका मृतक महिलेची अद्याप ओळख पटलेली नाही. जखमींमध्ये पंकज दिलीप गोपाळ रा. नांद्रा हवेली, ता. जामनेर, जि. जळगाव)दीपिका विश्वास,टीना अजय पाटील व एक अनोळखी महिला यांचा समावेश आहे. या घटनेबाबत अक्षय भास्कर सोनवणे यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. या प्रकरणाचा तपास सपोनि हेमराज कोळी, ठाणेदार पो.स्टे. एमआयडीसी मलकापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून मपोहेकाँ नीता मारोती वाढे पुढील तपास करीत आहेत. घटनास्थळी काल रात्री जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, विभागीय महसूल अधिकारी, शहर पोलीस निरीक्षक गणेश गिरी यांनी भेट देऊन अपघाताची माहिती जाणून घेतली आहे.

# कर्नाटकात वगळली,महाराष्ट्रात जोडली!

## राहुल गांधींचा वोटर लिस्टवर पुन्हा हल्लाबोल

**नवी दिल्ली ।** राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा केंद्रीय निवडणूक आयोग आणि भारतीय जनता पक्षाला मत चोरी प्रकरणात घेरले. राहुल गांधी यांनी गुरुवारी १८ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषद घेतली. ते हायड्रोजन बॉम्ब फोडणार असे सांगण्यात येत होते. पण त्यांनी गेल्यावेळीप्रमाणेच काही उदाहरणं देत मत चोरीचा पॅटर्न, त्यासाठी मोठे सॉफ्टवेअरचा वापर होत असल्याचा इतकेच नाही तर कॉल सेंटरमधून ही प्रक्रिया राबवण्यात आल्याचा गंभीर आरोप केला. मत चोरी प्रकरणात मी जो काही दावा करत आहे. तो मोठ्या जबाबदारीने करत आहे. माझ्याकडे भक्कम पुरावे असल्याचा दावा त्यांनी केला. इतकेच नाही तर यावेळी त्यांनी काही मतदारांना सुद्धा मंचावर उभं करत निवडणूक आयोगासमोर आव्हान उभे केले.



राहुल गांधी म्हणाले की अगोदरच सांगतो की हा काही हायड्रोजन बॉम्ब नाही. हायड्रोजन बॉम्ब लवकरच पडेल. या देशातील तरुणांसमोर ही उदाहरणं समोर आणत आहे. त्यांना मत चोरी कशी करण्यात आली, निवडणुकीत कशी गडबड करण्यात आली हे दाखवण्याचा हा प्रयत्न आहे.

कर्नाटकातील अलंद या मतदार संघाचे त्यांनी उदाहरण दिले. कोणीतरी ६०१८ मतदारांची नाव वगळली. २०२३ मधील निवडणुकीत अलंद या मतदारसंघातून किती मतदार हटवण्यात आले हे आम्हाला माहिती नाही. ही संख्या ६०१८ पेक्षा अधिक आहे. पण ही नाव हटवताना योगायोगाने काही जण पकडल्या गेले. तिथल्या बुथ लेव्हल अधिकाऱ्याला त्याच्या काकाचे नाव हटविल्याचे लक्षात आले. तेव्हा त्याने त्याचा तपास घेतला. त्याने त्याच्या शेजाऱ्याकडे चौकशी केली. तेव्हा त्याने आपण असा कोणताही अर्ज केला नसल्याचे सांगितले. म्हणजे ज्याने मतदाराचे नाव वगळण्याची मागणी केली आणि ज्याचे मतदार यादीतून नाव गायब झाले त्या दोघांनाही हा प्रकार माहिती नव्हता. कोणत्या तरी बाहेरील शक्तीने ही प्रक्रिया हायजॅक केली आणि मतदारांची नाव यादीतून वगळली.

तर विदर्भातील राजुरा विधानसभा मतदार संघात ६८५० मतदारांची नाव जोडण्यात आली. त्यांचा काहीच थांगपत्ता नसल्याचे ते म्हणाले. कोणती तरी यंत्रणा, अत्याधुनिक सॉफ्टवेअर वापरून हा प्रकार करण्यात आल्याचा. त्यासाठी कॉल सेंटरचा वापर झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

### केळी भाव

नवती (१) : 1475
नवती (२) : 1275


### मिश्कीली




# ‘नमो नेत्र संजीवनी’ अभियान ठरणार वरदान

## पहिल्या दिवशी १५ हजार नागरिकांना लाभ

**मुंबई ।** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबरपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ‘नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान’ महाराष्ट्रभर सुरू झाले आहे. महात्मा गांधी जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) चालणाऱ्या या भव्य उपक्रमांतर्गत १० लाखांहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी १५ हजारांहून अधिक नागरिकांची तपासणी होऊन १,८५७ मोतीबिंदू शस्त्रक्रिया व इतर उपचाराला सुरूवात झाली.



संपूर्ण राज्यभर राबविण्यात येणाऱ्या या भव्य उपक्रमाचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा प्रयत्नशील आहेत. राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये, तालुका व गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. गाव, वस्ती, तांडे, पाडे यांसह दुर्गम भागातील नागरिकांना या शिबिरांचा थेट लाभ मिळत आहे. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व संलग्न वैद्यकीय संस्थांकडे पाठवून संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया व औषधोपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. या अभियानात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, वैद्यकीय शिक्षण विभाग, नगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, धर्मादाय रुग्णालये, महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, ईएसआयसी रुग्णालये तसेच खासगी नेत्रतज्ज्ञ रुग्णालये व विविध सामाजिक संस्था सक्रिय सहभाग नोंदवत आहेत. या सर्व संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अधिक व्यापक आणि यशस्वी ठरत आहे. नेत्ररोग उपचाराचा खर्च गोर-गरीब नागरिकांना परवडणारा नसतो. अशा परिस्थितीत ही मोफत शिबिरे गरजू व वंचित घटकांसाठी मोठा दिलासा ठरत आहेत.

## हैदराबाद गॅझेट विरुद्धची याचिका फेटाळली

**मुंबई ।** हैदराबाद गॅझेट लागू केल्याचा जीआर शासनाने काढला, मात्र त्यानंतर या जीआरला मुंबई हाय कोर्टात आव्हान देण्यात आले होते, या निर्णयाविरोधात याचिका दाखल करण्यात आली होती,ती याचिका फेटाळण्यात आल्याने मराठा आंदोलकांना दिलासा मिळाला आहे.विनीत धोत्रे यांनी या जीआरविरोधात मुंबई हाय कोर्टात जनहित याचिका दाखल केली होती. मात्र सुनावणीवेळी हाय कोर्टाकडून या याचिकेवर सवाल उपस्थित करण्यात आले. ओबीसी संदर्भातील शासन निर्णयाने याचिकाकर्ते बाधित कसे झाले असा सवाल यावेळी हाय कोर्टाकडून उपस्थित करण्यात आला होता. दरम्यान त्यानंतर ही जनहित याचिका ग्राह्य धरण्याजोगी नाही, असे म्हणत न्यायालयाने म्हटले.

## ओबीसी महामंडळांना सदस्यांची प्रतीक्षा

मुंबई । मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या निर्णयावरून ओबीसी समाजात खदखद असताना सरकारने ओबीसींसाठी स्थापन केलेल्या २१ पैकी २० महामंडळांवर अजून अशासकीय सदस्य नेमलेले नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने त्यांच्या वाट्याला आलेल्या महामंडळांवर नेमणुकीचा धडका लावला असताना ओबीसी महामंडळांवरील नेमणुका रखडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. महायुती सरकारने गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विविध समाज घटकांना खूश करण्यासाठी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली होती.

